International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# जागतिकीकरणाच्या युगातील आंतरराष्ट्रीय संबंध आणि परराष्ट्र धोरण

**किर्ती विजय करंजावणे**

*वसंतदादा पाटील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, पाटोदा, जिल्हा – बीड*

*Corresponding Author – किर्ती विजय करंजावणे*

**DOI - 10.5281/zenodo.18655358**

**सारांश:**

प्रामुख्याने शीतयुद्धोत्तर काळात निर्माण झालेल्या नवीन विश्वरचनेमध्ये जागतिकीकरणाला महत्व प्राप्त झाले असून जागतिकीकरणाला एक प्रकारे अपरिहार्यता प्राप्त झाली आहे.राष्ट्रांची इच्छा असो वा नसो प्रत्येक राष्ट्र आज जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत ओढले गेले आहे. जागतिकीकरणामुळे जगातील राष्ट्रांमधील आर्थिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक परस्परसंबंध अधिक गतीमान झाले आहेतया प्रक्रियेचा आंतरराष्ट्रीय संबंधांवर तसेच राष्ट्रांच्या परराष्ट्र धोरणांवर खोलवर परिणाम झालेला . प्रस्तुत संशोधन निबंधात जागतिकीकरणाची संकल्पना .दिसून येतो, तिचा आंतरराष्ट्रीय संबंधांवरील प्रभाव, तसेच बदलत्या जागतिक परिस्थितीत परराष्ट्र धोरणांची भूमिका यांचा अभ्यास करण्यात आला आहेविशेषतः विकसनशील देशांच्या परराष्ट्र . धोरणांवर जागतिकीकरणामुळे झालेला परिणाम निर्माण झालेल्या संधी व आव्हानांचा विचार करण्यात आला आहे.

**बीज शब्द: जागतिकीकरण, आंतरराष्ट्रीय संबंध, परराष्ट्र धोरण, अर्थकारण, राजकारण**

**प्रस्तावना:**

२०व्या शतकाच्या उत्तरार्धात जागतिकीकरण ही संकल्पना आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्त्वाची ठरली. जागतिकीकरण ही विविध पातळ्यांवर लोकांमधील तसेच राष्ट्रांमधील संबंध, क्रिया-प्रतीक्रिया वाढविणारी प्रक्रिया आहे.माहिती-तंत्रज्ञानातील प्रगती, आंतरराष्ट्रीय व्यापारवाढ, बहुराष्ट्रीय कंपन्यांचा उदय आणि जागतिक संस्था यांमुळे राष्ट्रांमधील सीमांचे महत्त्व तुलनेने कमी झाले. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा प्रवास एका विश्व संस्कृतीच्या तसेच विश्व आर्थिक आणि राजकीय व्यवस्थेच्या निर्मितीच्या दिशेने होत आहे.जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे लोकांमधील आंतर कमी होत असून Global Village ची संकल्पना आकाराला येत आहे. या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय संबंधांची व्याप्ती वाढली असून परराष्ट्र धोरणे अधिक गतिशील व बहुआयामी बनली आहेत. या बदलांचा थेट परिणाम आंतरराष्ट्रीय संबंधांवर आणि परराष्ट्र धोरणांवर झाला आहे.

पूर्वी आंतरराष्ट्रीय संबंध प्रामुख्याने युद्ध, शांतता, सामरिक धोरणे आणि सत्तासंतुलन यांपुरते मर्यादित होते. मात्र जागतिकीकरणामुळे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, पर्यावरणीय आणि तांत्रिक घटकही आंतरराष्ट्रीय संबंधांचा अविभाज्य भाग बनले आहेत. त्यामुळे परराष्ट्र धोरण हे केवळ राजकीय न राहता बहुआयामी स्वरूपाचे झाले आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१. जागतिकीकरणाची संकल्पना आणि वैशिष्ट्ये स्पष्ट करणे.
२. जागतिकीकरणाचा आंतरराष्ट्रीय संबंधांवर होणारा परिणाम अभ्यासणे.

३. जागतिकीकरणाच्या युगातील परराष्ट्र धोरणातील बदलांचे विश्लेषण करणे.
४. विकसनशील राष्ट्रांसमोरील संधी व आव्हानांचा अभ्यास करणे.

**जागतिकीकरणाची संकल्पना:**

सर्वसाधारणपणे जागतिकीकरण ही उत्पादने, सेवा, भांडवल, लोक, माहिती आणि संस्कृती यांच्या सीमापार वाढत्या प्रवाहाला दर्शविणारी संकल्पना आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांपैकी काहींना जागतिकीकरण ही वैश्विक पातळीवर होत असलेली राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक एकीकरणाची प्रक्रिया वाटते तर काहींना जागतिकीकरण मुक्त व्यापार आणि मुक्त बाजारपेठांच्या माध्यमातून वैश्विक एकीकरण साधणारी प्रक्रिया वाटते. थोडक्यात जागतिकीकरण म्हणजे जगातील विविध राष्ट्रांमधील आर्थिक, राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक परस्परसंबंधांची वाढ होय. या प्रक्रियेमुळे जागतिक पातळीवर एकत्रित बाजारपेठ, माहितीचा वेगवान प्रसार आणि तंत्रज्ञानाचे सार्वत्रिकीकरण घडून आले आहे. जागतिकीकरणामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्रांचे पारंपरिक महत्व कमी होऊन बहुराष्ट्रीय कंपन्या आणि आंतरराष्ट्रीय संस्था, संघटनाचे राज्यकांचे महत्व वाढले आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे राष्ट्रांच्या आर्थिक आणि राजकीय सार्वभौमत्वाची प्रक्रिया मागे पडून विभागीय तसेच आंतरराष्ट्रीय आर्थिक आणि राजकीय सार्वभौमत्वाने घेतली आहे.

**जागतिकीकरणाची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत:**

१. मुक्त व्यापार आणि बाजारपेठेचे उदारीकरण
२. बहुराष्ट्रीय कंपन्यांची प्रभावी भूमिका
३. माहिती आणि तंत्रज्ञानाचा वेगवान प्रसार
४. बिगर शासकीय संघटनांची सक्रियता
५. राष्ट्रांमधील आर्थिक परस्परावलंबन
६. विभागीय व्यापारसंघांची वाढती भूमिका

**जागतिकीकरण आणि आंतरराष्ट्रीय संबंध:**

जागतिकीकरणामुळे आंतरराष्ट्रीय संबंधांचे स्वरूप मूलभूतरीत्या बदलले आहे. आज राष्ट्रे एकमेकांवर आर्थिक, तांत्रिक आणि राजकीय दृष्ट्या अधिक अवलंबून झाली आहेत. या परस्परावलंबनामुळे संघर्षांची शक्यता काही प्रमाणात कमी झाली असली, तरी नव्या स्वरूपाच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. शीतयुद्धोत्तर आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत आज काही राष्ट्रे अशी आहेत की ज्यांनी आंतरराष्ट्रीय कायद्यालाच आव्हान दिले आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्रांच्या वर्तनाविषयी जे नियम असतात ते पाळण्यासदेखील काही राष्ट्रे तयार नाहीत. या राष्ट्रांमुळे आज आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा धोक्यात आली आहे. या राष्ट्रांच्या वर्तणुकीमुळे विभागीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर असुरक्षितता निर्माण झाली आहे. या राष्ट्रांना 'रोग स्टेटस''असे म्हण्टले जाते. या रोग स्टेटस राष्ट्रांमध्ये इराक, इराण, लिबिय, उत्तर कोरिया यासारख्या राष्ट्रांचा समावेश होतो की ज्यांचे परराष्ट्र धोरण आज हेखेखोरपणा, युद्धपिपासू प्रवृत्ती याकडे झुकलेले पाहायला मिळते. याचबरोबर जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे राज्यकांचे (Non –State Actors) सबलीकरण झाल्याचे पहायला मिळते. आज फुटीरतावाद, दहशतवाद, धर्मांध, मूलतत्ववाद इत्यादी घटकांचे सामर्थ्य वाढले असून हे घटक आज अनेक राष्ट्रांच्या सुरक्षिततेला आव्हान देताना दिसतात. त्याचबरोबर संघटीत गुन्हेगारांचे सामर्थ्यदेखील जागतिकीकरणाच्या रेट्यात वाढले आहे. अमली पदार्थांचा, शस्त्रास्त्रांचा काळाबाजार करणारे आज सामर्थ्यशाली

बनल्याचे पाहायला मिळतात.रोग स्टेट्स पेक्षाही राज्यकांकडून आज व्यक्ती आणि राष्ट्राच्या सुरक्षेला मोठे आव्हान दिले गेलेले आहे.

आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये संयुक्त राष्ट्र संघ, जागतिक व्यापार संघटना (WTO), आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) आणि जागतिक बँक यांची भूमिका वाढली आहे. या संस्थांमुळे जागतिक नियमावली, व्यापार करार आणि आर्थिक धोरणांवर प्रभाव पडतो. परिणामी राष्ट्रांच्या स्वायत्ततेवर काही प्रमाणात मर्यादा येताना दिसतात.

जागतिकीकरणामुळे राष्ट्राराष्ट्रातील गुंतागुंत, परस्परावलंबीत्व एवढे वाढले आहे की, याचे नकारात्मक पडसाद आज उमटताना दिसतात. जगाच्या पाठीवर एका कोपऱ्यात निर्माण झालेल्या एखाद्या समस्येचे पडसाद तात्काळ दुसऱ्या कोपऱ्यात उमटतात. उदा: एखादा साथीचा रोग असेल किंवा एखादा हिंसक उठाव, यादवी युद्ध, वांशिक दंगली इत्यादी. जागतिकीकरणाच्या प्रक्रीयेअंतर्गत माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रात जी क्रांती घडून आली त्यामुळे अण्वस्त्रांच्या प्रसाराला चालना मिळाली आहे. अण्वस्त्रे बनविण्याचे तंत्रज्ञान इंटरनेट, इमेलच्या माध्यमातून अगदी सहज मिळविता येऊ लागले, हस्तांतरित केले जाऊ लागले. याचा फायदा घेऊन अनेक राष्ट्रांनी छुप्या मार्गाने विध्वंसक शस्त्रे, अण्वस्त्रे निर्माण करून आज राष्ट्रा-राष्ट्रांमध्ये भीती आणि स्पर्धा निर्माण केली आहे.

**जागतिकीकरणाच्या युगातील परराष्ट्र धोरण:**

परराष्ट्र धोरण म्हणजे एखाद्या राष्ट्राने इतर राष्ट्रांशी संबंध ठेवण्यासाठी स्वीकारलेली तत्त्वे, उद्दिष्टे आणि कृती यांचा संच होय. जागतिकीकरणाच्या युगात परराष्ट्र धोरण अधिक लवचिक, व्यवहार्य आणि आर्थिकदृष्ट्या केंद्रित झाले आहे.

आजच्या परराष्ट्र धोरणात खालील घटकांना महत्त्व प्राप्त झाले आहे:

१. आंतरराष्ट्रीय व्यापार आणि गुंतवणूक
२. ऊर्जा सुरक्षा
३. पर्यावरण संरक्षण आणि हवामान बदल
४. दहशतवादविरोधी सहकार्य
५. प्रादेशिक आणि जागतिक सहकार्य

परराष्ट्र धोरण ठरवताना केवळ लष्करी सामर्थ्य नव्हे, तर आर्थिक ताकद, सॉफ्ट पॉवर, सांस्कृतिक प्रभाव आणि कूटनीती यांनाही महत्त्व दिले जाते.

**विकसनशील राष्ट्रे: संधी आणि आव्हाने:**

जागतिकीकरणामुळे विकसनशील देशांसाठी अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत. परकीय गुंतवणूक, तंत्रज्ञान हस्तांतरण, रोजगारनिर्मिती आणि जागतिक बाजारपेठेत प्रवेश यामुळे आर्थिक विकासाला चालना मिळाली आहे.

मात्र त्याचबरोबर अनेक आव्हानेही निर्माण झाली आहेत. आर्थिक विषमता वाढणे, स्थानिक उद्योगांवर परकीय कंपन्यांचा दबाव, सांस्कृतिक स्वातंत्र्यावर परिणाम आणि राष्ट्रीय सार्वभौमत्वाला निर्माण होणारा धोका ही प्रमुख आव्हाने आहेत. त्यामुळे विकसनशील राष्ट्रांना संतुलित आणि राष्ट्रीय हितांना प्राधान्य देणारे परराष्ट्र धोरण स्वीकारावे लागते.

**जागतिकीकरणानंतरचे भारताचे परराष्ट्र धोरण (१९९१ नंतर):**

१९९१ मध्ये भारताने स्वीकारलेल्या नव्या आर्थिक धोरणामुळे (LPG – Liberalization, Privatization, Globalization) भारताच्या परराष्ट्र धोरणाला नवी दिशा मिळालेली पाहायला मिळते.

शीतयुद्धोत्तर काळात बदललेल्या जागतिक परिस्थितीत भारताने आर्थिक विकास, बहुपक्षीयता आणि व्यवहार्य कूटनीती यांवर आधारित परराष्ट्र धोरण स्वीकारले.

**१) आर्थिक राजनय :**

- भारताच्या परराष्ट्र धोरणाचा केंद्रबिंदू आर्थिक विकास बनला आहे.
- थेट परकीय गुंतवणूक (FDI) आकर्षित करण्यासाठी सक्रिय राजनयाचा वापर भारत करत आहे.
- WTO, IMF, World Bank यांसारख्या जागतिक आर्थिक संस्थांमध्ये सहभाग
- द्विपक्षीय व प्रादेशिक व्यापार करार (FTA, CEPA, CECA) *उदा.* अमेरिका, EU, ASEAN, जपान, दक्षिण कोरिया यांच्याशी आर्थिक सहकार्य

**२) भारताची Look East → Act East Policy:**

- भारताची १९९१ मध्ये **Look East Policy** होती तर २०१४ नंतर **Act East Policy** आहे
- दक्षिण-पूर्व आशियाशी व्यापार, सुरक्षा व सांस्कृतिक संबंध दृढ करण्यावर भारताचा भर आहे.
- ASEAN, BIMSTEC, Indo-Pacific क्षेत्रात भारताची सक्रिय भूमिका राहिली आहे.

**३) बहुपक्षीयता आणि जागतिक सहभाग:**

- संयुक्त राष्ट्रसंघ, G20, BRICS, SCO, QUAD यांमध्ये आज भारताची सक्रिय भूमिका दिसून येते
- जागतिक प्रशासनात (Global Governance) सुधारणा करण्याची मागणी भारत करत आहे
- UN Security Council मध्ये स्थायी सदस्यत्वासाठी भारत प्रयत्न करत आहे.

**४) सामरिक स्वायत्तता:**

- कोणत्याही गटात न अडकता स्वतंत्र आणि संतुलित धोरण स्वीकारण्याची भारताची भूमिका आहे.
- अमेरिका, रशिया, युरोप, जपान यांच्याशी सहकार्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न भारत करत आहे.
- भारत चीनशी स्पर्धा व संवाद – दोन्हीचा समन्वय साधण्याचा प्रयत्न करत आहे.

**५) शेजारील राष्ट्र धोरण:**

- दक्षिण आशियातील शेजारी देशांशी संबंध सुधारण्याला भारत प्राधान्य देत आहे.
- SAARC, BIMSTEC द्वारे प्रादेशिक सहकार्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न भारत करत आहे.
- नेपाळ, बांगलादेश, श्रीलंका, भूतान, अफगाणिस्तान यांना विकास सहाय्य भारत करत आहे.

**६) संरक्षण व सुरक्षा सहकार्य:**

- संरक्षण क्षेत्रात परकीय सहकार्य आणि तंत्रज्ञान हस्तांतरणाला भारत महत्व देत आहे.
- अमेरिका, फ्रान्स, रशिया, इस्रायल यांच्याशी संरक्षण करार करण्याची भारताची भूमिका आहे.
- दहशतवादविरोधी लढा आणि सायबर सुरक्षा सहकार्य भारताला आज महत्वाचा वाटत असून त्यासाठी भारत कटिबद्ध आहे.

**७) मृदु शक्ती:**

- योग, आयुर्वेद, बौद्ध वारसा, चित्रपट, भारतीय संस्कृतीचा जागतिक प्रसार आज भारत जागतिक पातळीवर करत असून त्यात भारताला यश मिळत आहे.
- परदेशस्थ भारतीय (Diaspora) हा भारताच्या राजनयातील महत्त्वाचा घटक बनला आहे.

- आंतरराष्ट्रीय योग दिनाची मान्यता म्हणजेच जग भारताच्या विचारांना स्वीकारत असल्याची पोचपावती आहे.

थोडक्यात जागतिकीकरणानंतर भारताचे परराष्ट्र धोरण आर्थिक विकासकेंद्री, व्यवहार्य, बहुपक्षीय आणि सामरिकदृष्ट्या स्वायत्त बनले आहे. भारत आज केवळ प्रादेशिक नव्हे तर जागतिक स्तरावर जबाबदार शक्ती (Responsible Global Power) म्हणून उदयास येत असल्याचे पाहायला मिळते.

**निष्कर्ष:**

जागतिकीकरणाच्या युगात आंतरराष्ट्रीय संबंध आणि परराष्ट्र धोरण यांचे स्वरूप अधिक व्यापक, गतिमान आणि गुंतागुंतीचे झाले आहे. राष्ट्रांना आपल्या राष्ट्रीय हितांचे संरक्षण करताना जागतिक सहकार्य आणि परस्परावलंबन यांचा समतोल साधावा लागतो. भविष्यातील आंतरराष्ट्रीय राजकारण हे बहुपक्षीय, संवादप्रधान आणि सहकार्यावर आधारित असेल, असे दिसून येते. त्यामुळे प्रभावी आणि दूरदृष्टीपूर्ण परराष्ट्र धोरण हे प्रत्येक राष्ट्रासाठी अत्यावश्यक ठरते.

**संदर्भसूची:**

१. समकालीन जागतिक राजकारण, डॉ. शैलेंद्र देवळाणकर, विद्या बुक्स पब्लिशर्स, तिसरी आवृत्ती, सप्टेंबर २०११
२. मोदी कालखंडातील भारताचे परराष्ट्र धोरण सातत्य आणि स्थित्यंतर, डॉ. शैलेंद्र देवळाणकर, सकाळ प्रकाशन, तृतीय सुधारित आवृत्ती, नोव्हेंबर २०१६
३. FOREIGN POLICY OF INDIA, V.N. KHANNA, VIKAS PUBLISHING HOUSE PVT.LTD, SIXTH EDITION
४. International Relations, Vinay Kumar Malhotra, ANMOL PUBLICATIONS PVT.LTD., 4th Revised and Enlarged Edition
५. आंतरराष्ट्रीय राजकारणावरील संशोधन लेख व नियतकालिके.